# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक:- ८४-२३** **दिनांक:- १५/०३/२०२३**

## अपघात केल्याप्रकरणी ५ करोड रुपयांची खंडणी मागणा-या आरोपीतास नांदेड येथून अटक काशिमीरा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक २०.१२.२०२२ रोजी तक्रारदार नामे सत्यप्रकाश पुरुषोत्तम आर्य हे त्यांचे परिवारासह जुनागड, गुजरात येथे देवदर्शनासाठी गेले असता तेथे त्यांचे चारचाकी गाडीचा मोटार सायकलला धक्का लागुन अपघात झाला होता. सदरवेळी तक्रारदार यांनी त्यांचा मित्र प्रशांत संभानंद सवणेकर रा. शिवरायनगर, तरोडा, नांदेड यास घटनेविषयी माहिती दिली असता मित्र प्रशांत सवणेकर याने तक्रारदार यास व्हॉटसअपद्वारे फोन करुन अपघातग्रस्त मोटार सायकल अदयाप अपघाताचे ठिकाणीच असुन मोटार सायकलस्वार याची तब्बेत जास्त खराब असून तो सध्या जुनागढ, गुजरात येथील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे असे वेळोवळी सांगून केस मॅनेज करणेकामी रक्कम मागितली असता तक्रारदार यांनी घाबरुन वेळोवेळी त्यांचे एस.बी.आय. व एच.डी.एफ.सी. बॅकेतुन ४७,९९,५०१/- रुपये आर.टी.जी.एस. द्वारे आरोपीचे सेट्रल बॅक ऑफ इंडीया बॅकेत ट्रान्सफर केले होते.

त्यानंतर प्रशांत सवणेकर याने अपघातग्रस्त मोटार सायकलस्वार मयत झाल्याचे तक्रारदार यास सांगुन केस मॅनेज करणेकामी ४ करोड रुपये त्याने दिले असुन अदयाप ०१ करोड रुपये देणे बाकी आहे असे बोलुन ५ कोटी रुपयेची खंडणीची मागणी केली असता फिर्यादी यांनी नकार दिल्याने प्रशांत सवणेकर याने फिर्यादी यांना धमकी देवुन खंडणीची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पो. ठाणे गुरक्र. I १७९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८६,५०४,५०६ प्रमाणे दिनांक १०.०३.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे काशिमिरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहीतीच्या आधारे आरोपी प्रशांत संभानंद सवणेकर रा. शिवरायनगर, तरोडा, नांदेड यास निष्पन्न करुन दिनांक १३.०३.२०२३ रोजी नांदेड येथुन अटक केली आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदीप कदम, पो. उप.निरी. निखील चव्हाण, पो.हवा. जयप्रकाश जाधव, पोलीस उप आयुक्त कार्यालयातील स्टाफ यांनी केली आहे.

------ oooo ------